# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक १४.०८.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १३.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये १६ केसेसमध्ये १६ ईसमावर कारवाई करून एकुण २१,९९५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०५ केसेसमध्ये १६ इसमांवर कारवाई करुन १,०२,१३५/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,१८७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,९३,३००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक १३.०८.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक १४.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०७ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथकाची कामगिरी :— अंमली पदार्थ बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई.**

मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आदेशान्वये, संपुर्ण नागपुर शहरात दिनांक १३.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दि. १४.०८.२०२६ चे ०२.०० वा. दरम्यान, ऑपरेशन ऑल आऊट राबविण्यात आले. ऑपरेशन दरम्यान दिनांक १३.०८.२०२६ चे २३.१५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे कळमणा हद्यीत, प्लॉट क्र. ५, गुलशननगर, नाग मंदीरजवळ राहणारा इसम नामे संतोष उर्फ मामा उर्फ कुबडा राजुदास यादव वय ३१ वर्ष हा आपले घरी प्रतिबंधीत अंमली पदार्थांच्या गोळया बाळगुन आहे. अशा माहीतीवरून तेथे जाऊन, संतोष उर्फ मामा यादव चे राहते घराची पाहणी केली असता, घरझडतीमध्ये प्रतिबंधीत NITZASCEN-10 NITRAZEPAM TABLETS कि. ४५/— प्रति स्ट्रीप ज्यावर 'श्येडयुल एच १ प्रिस्क्रीप्शन ड्रग' असे लिहलेले दिसून आले. त्यास नमुद गोळयांबाबत विचारणा केली असता, त्याचेकडे कोणताही परवाना नसल्याचे सांगून, नमुद गोळया पाहिजे आरोपी क्र. १) सुमित राजुदास यादव वय २५ वर्ष रा. प्लॉट क्र. ५, गुलशननगर, नाग मंदीरजवळ २) शेट्टी नावाचा इसम यांचे मदतीने आणल्याचे सांगितले. तसेच, घरझडतीमध्ये एक लोखंडी कोयता, एक लोखंडी चाकु, व दोन स्टीलचे चाकु सुदधा मिळून आले. आरोपीचे ताब्यातुन प्रतिबंधीत गोळया व चार शस्त्रे असा एकुण ५,८६२/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता प्रतिबंधीत नशेच्या गोळया व शस्त्रे बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट, सहकलम ४,२५ भा.ह.का., सहकलम

१३५ म.पो.का. नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कळमणा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोहवा चंद्रेशेखर गौतम, राजु टाकळकर, शेख नजीर, गणेश ठाकरे, दीपक बावणकर, विशाल नागभिडे, रोशन तांदुळकर, लिलाधर खिरटकर, सुधिर तिवारी, आशिष पवार यांनी केली.



**<u>३) कळमणा पोलीसांची कामगिरी :— अंमली पदार्थ बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई.</u>**

दिनांक १४.०८.२०२६ चे ०१.१५ वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना कळमणा रेल्वे क्रॉसिंग ओव्हरब्रिजखाली एक पांढऱ्या रंगाची क्रेटा कार क्र. एमएच ४९ एएस ५९३६ ही अपघातग्रस्त स्थितीत दिसुन आली. पोलीसांनी गाडीजवळ जाऊन पाहणी केली असता, त्यामध्ये एक इसम बसलेला मिळून आला. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव दीपक जगदीशप्रसाद सोनी वय २६ वर्षे, रा. मिनीमाता नगर, एनआयटी बिल्डींग, क्वॉर्टर क्र. ३०१, कळमणा, नागपुर असे सांगीतले. त्याचे वाहनात अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, पंचासमक्ष एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, कारची झडती घेतली असता, कारमध्ये एका झिपलॉक पन्नीमध्ये ६.५६ ग्रॅम अंमली पदार्थ एमडी पावडर तसेच, उग्र वास येणारा ओलसर गांजा १.०९९ किलोग्राम वजनाचा मिळुन आला. आरोपीस अधिक विचारणा केली असता, त्याने एम.डी. पावडर व गांजा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी सोनु नावाचा इसम रा. ताजबाग, नागपूर याचे मदतीने विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, गांजा, ०१ मोबाईल फोन व क्रेटा कार असा एकुण ११,३६,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर व गांजा विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२०(ब)ii(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे कळमणा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परेदशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. प्रविण काळे व त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**<u>४) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :— वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस.</u>**

गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे दिनांक १३.०८.२०२६ चे २३.०० ते १४. ०८.२०२६ चे ०२.०० वा. दरम्यान, मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आदेशान्वये ऑपरेशन ऑल आऊट राबवितांना, पोलीस ठाणे जरीपटका हद्यीत गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असतांना, इंदोरा मैदान, जरीपटका येथे त्यांना एका विनानंबरचे दुचाकीवर दोन मुले संशयीतीरित्या जातांना दिसून आले. त्यांचा पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, ते अल्पवयीन असल्याने दिसून आले. त्यांना वाहनाबाबत विचारणा केली असता, त्यांनी संगनमताने कोराडी देवीमंदीर पार्कींगमधुन चोरी केल्याचे सांगितले. नमुद वाहन चोरी बाबत माहिती काढली असता गाडीचा मुळ क्रमांक. एमएच. ४९ सीई ६५०१ असल्याचे निष्पन्न झाले. नमुद वाहनाबाबत पोलीस ठाणे कोराडी येथे गुन्हे अभिलेख तपासला असता, फिर्यादी सुजल धर्मराज उईके वय १९ वर्ष रा. न्यु इंदोरा, बाराखोली, गली क्र. ३, जरीपटका, नागपूर यांनी त्यांचा मित्र नामे पियुष सहारे रा. न्यु इंदोरा यांचे नावे असलेली त्यांची होन्डा स्प्लेंडर दुचाकी गाडी क्र. एमएच. ४९ सीई ६५०१ किंमती ८०,०००/—रू. ची पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील देवीमंदीर परिसर येथे पार्कींगमध्ये लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे ताब्यातील नमुद गाडी चोरून नेली अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल असल्याचे दिसून आले. दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालकांना मुद्येमालासह पुढील कार्यवाहीकामी कोराडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**<u>५) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस.</u>**

दिनांक १०.०८.२०२६ चे ०९.०० वा. ते १६.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी कु. वंशिका अशोक ढेंगे वय २१ वर्ष रा. राजेंद्र वार्ड, मेहर अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०२, गणेशपुर, भंडारा, ह.मु.— धोटे ले—आऊट, जुनी अजनी, नागपूर यांनी त्यांची होन्डा ॲक्टीवा गाडी क्र. एमएच. ४९ बिडी १९७२ किंमती ५०,०००/—रू. ची पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत शालिनीताई मेघे नर्सिंग कॉलेज, वानाडोंगरी येथे पार्कींगमध्ये लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद ॲक्टीवा गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी समांतर तपासादरम्यान, तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपीस निष्पन्न करुन, आरोपी नामे अनुराग प्रविण धाबर्डे वय १९ वर्षे रा. कुडकी ग्राम तलोडी, सेलु रोड, ता. सेलु, जि. वर्धा यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले दुचाकी वाहन किंमती अंदाजे ५०,०००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्येमालासह पुढील कार्यवाहीकामी एमआयडीसी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली वाहन चोरी विरोधी पथकाचे पोहवा. रोशन तिवारी व पथकातील अंमलदार यांनी केली.



**६) गुन्हेशाखा युनिट क. २ पोलीसांची कामगिरी :— ऑटोरिक्षा चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक ०८.०८.२०२६ चे २३.०० वा. ते २३.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी शैलेष बाबुराव लांजेवार वय ३५ वर्ष रा. प्लॉट क्र. ६८२, फरस चौक पकोडेवाले हॉटेलचे बाजुला, मानकापूर, नागपूर यांनी त्यांचा वापरता मॅक्सिमा ऑटोरिक्षा क्र. एमएच. ३१ एफबी ४३८१ किंमती ८०,०००/—रू. चा पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत पकोडेवाले हॉटेलचे बाजुला, लॉक करून, पार्क करून राहते घरी कपडे बदलण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचा नमुद ऑटोरिक्षा चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा युनिट क्र. २ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे ऑपरेशन ऑल आऊट राबवितांना पेट्रोलींग करीत असता, त्यांना वर नमुद ऑटोरिक्षा दिसून आल्याने, त्यास थांबवून ऑटोरिक्षा चालकास पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव निलेश राजेंद्र सोनवाने वय २६ वर्षे रा. लक्ष्मीनगर, हनुमान मंदीरजवळ, गोधनी रोड, मानकापूर, नागपूर असे सांगितले. त्याचे ताब्यातील ऑटोरिक्षाबाबत विचारणा केली असता, त्याने नमुद ऑटोरिक्षा पकोडेवाला दुकानासमोरुन चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेला मॅक्सिमा ऑटोरिक्षा किंमती अंदाजे ८०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीकामी मानकापूर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. शुंभागी देशमुख व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



---

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे अंबाझरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १३.०८.२०२६ चे २३.३० ते १४.०८.२०२६ चे ००.१५ वा. चे दरम्यान, अंबाझरी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे ऑपरेशन ऑल आऊट राबवित असता, त्यांनी पोलीस ठाणे

हद्दीतील अंबाझरी रोडवरील 'जेन झीस कॅफे' येथे रेड कारवाई केली. तेथे आरोपी क्र. १) कॅफेमालक– नितीन बाळकृष्ण जाधव वय ३५ वर्ष रा. जिंजर मॉलजवळ, जरीपटका, नागपूर २) मॅनेजर/मालक– निखिल प्रदीप गावंडे वय २५ वर्ष रा. रामनगर, तेलंगखेडी, अंबाझरी, नागपुर हे ग्राहकांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आले. आरोपी हे विनापरवाना स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य ०४ हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखुजन्य हुक्का व ईतर साहित्य असा एकुण ८,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफेमालक व ग्राहक असे एकूण ०५ आरोपींचे विरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम २७४ भा.न्या.सं सहकलम ५,६,७,२० सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम –२००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम–२०१८.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे सिताबर्डी :–** दिनांक १३.०८.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, शितलामाता मंदीर, सेंट्रल बॅक एटीएम जवळ, मानस चौक येथे एक अनोळखी महिला वय अंदाजे ३५ वर्षे वयाच्या ह्या बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. अमोल नागरिक यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरु आहे.

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखा प्रेसनोट

नागपूर शहरातील वाहतूक परिमंडळ सिताबर्डी, येथील पो.स्टे. अंबाझरी हद्दीतील फुटाळा तलाव येथे दरवर्षी १५ ऑगस्ट ''स्वातंत्र्य दिन सोहळा'' उत्साहात साजरा करण्याचे निमित्याने फुटाळा तलाव रोडवर फार मोठया प्रमाणात नागरीकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने वाहतुकीची समस्या निर्माण होते. सदरचा १५ ऑगस्ट '' स्वतंत्र दिन सोहळा '' उत्साहात साजरा व सुरळीत पार पाडावा तसेच वाहतूक सुरळीत राहावी, नागरीकांना धोका, गैरसोय किंवा अडथळा होवू नये म्हणून दि. १२.०८.२०२६ ला खालील अधिसुचना निर्गमीत केली आहे.

**फुटाळा तलाव अंबाझरी वळण ते फुटाळा तलाव टी पांईट व उत्तर फुटाळा पुलापासुन (वायुसेनानगर मार्ग) ते दक्षिण फटाळा (वडाचे झाड) या मार्गावरील वाहतुक खालीलप्रमाणे वळविण्यात येत आहे.**

१) वाडी नाका कडुन फुटाळा तलाव मार्गे जाणारी वाहतुक जुना वाडी नाका ते रविनगर या मार्गाने वळविण्यात येणार आहे. तसेच भरतनगर कडुन येणारी वाहतूक अमरावती रोड/रविनगर महादेवमंदिर वायुसेनानगर या मार्गे वळविण्यात येणार आहे.

२) अमरावती ते नागपूर रोड मार्गे कॅम्पस चौक मार्गे फुटाळा तलाव कडे जाणारी वाहतूक ही सरळ भरतनगर चौक मार्गे वळविण्यात येईल.

३) फुटाळा वाय पाईंट ते वडाचे झाडाकडे जाणारी वाहतूक तेलंगखेडी हनुमान मंदिर किंवा सायकल चौकातून डावे वळण घेवुन अंबाझरी मार्गाने तसेच रामगिरी कडुन अमरावती रोड कडे जाणारी वाहतूक सायकल चौकातून डावे वळण घेवून अंबाझरी मार्गे वळविण्यात येईल.

**सदर अधिसुचना दिनांक १५.०८.२०२६ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक १५.०८.२०२६ चे २४.०० वा. पर्यंत अंमलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहनचालकांनी या आवाहनाचे पालन करुन आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/-**

**( आदित्य मिरखेलकर, भापोसे )**
पोलीस उप आयुक्त, वाहतूक
नागपूर शहर